# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 20.04.2025** **वार- रविवार**

---

**दिशाकृषी**

राज्य सरकारच्या कृषी विभागामार्फत दिशा कृषी उन्नतीची @ 2029 या कार्यक्रमाचं उद्या पुण्यात आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील विविध लोकप्रतिनिधी तसंच राज्याचे मंत्री उपस्थित राहणार आहेत.

**ईस्टर**

ईस्टर म्हणजेच प्रभू येशू ख्रिस्तांच्या पुनरुत्थानाचा दिवस आज पुण्यात विविध ठिकाणी भक्तीभावात साजरा होत आहे. यानिमित्त ठिकठिकाणच्या चर्चमधून विशेष प्रार्थनेसह अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**मायुपा**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'मायनॉरिटी युथ पार्लमेंट' अर्थात अल्पसंख्याक युवा संसद हा कार्यक्रम आज पुण्यात पार पडला. अल्पसंख्याक समाजातील युवकांच्या सशक्तीकरणासाठी नोकरी, शिक्षण आणि रोजगार अशा मुद्यांवर या कार्यक्रमात चर्चा करण्यात आली.

बिहारचे खासदार  पप्पू यादव, कश्मीरचे खासदार मोहीबुल्लाह नदवी, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष  हर्षवर्धन सपकाळ, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे,  ख्रिश्चन धर्मगुरू आणि समाजसुधारक बिशप थॉमस डाबरे यांसह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. युवा अल्पसंख्याकांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी धोरणात्मक दृष्टिकोन मांडण्यात आला.

**<u>कनेक्टिंगट्रस्ट</u>**

तरुणांनो, टोकाचा निर्णय घेऊ नका. बोलते व्हा, आपले मनमोकळे करा. मनातील नैराश्याचे ओझे दूर करून कणखरपणे उभे राहा,' अशी साद कनेक्टिंग ट्रस्टने तरुणाईला आणि समाजात नैराश्य, तणावाने ग्रस्त लोकांना घातली आहे. गेल्या तीन महिन्यात पिंपरी-चिंचवड आणि लगतच्या परिसरात २२४ जणांनी आत्महत्या केली असून यामध्ये सर्वाधिक प्रमाण तरुणांचे आहे. तरुण पिढीच्या मानसिक आणि भावनिक समस्यांकडे अतिशय गंभीरतेने बघायची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर कनेक्टिंग ट्रस्टने टोकाचा निर्णय घेऊ नका  असे आवाहन केले आहे. यासाठी ९९-२२-००-४३-०५ आणि ९९-२२-००-११-२२ या दोन विनामूल्य मदतवाहिन्यांवर संपर्क साधण्याचं आवाहन ट्रस्टने केलं आहे.

**<u>भूसंपादन</u>**

कोथरुड विधानसभा मतदारसंघातील बाणेर - बालेवाडी परीसरातील मिसींग लिंक जोडण्यासाठी पुढील काळात सक्तीचे भुसंपादन केले जाईल असं कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं. कोथरूड विधानसभा मतदार संघतील विकासकामांचा आढावा घेतल्यानंतर ते काल पत्रकारांशी बोलत होते. या रस्त्यांच्या कामासाठी पाच कोटी रुपये  खर्च असून जागा संपादन करण्यासाठी बारा कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. बाणेर - बालेवाडी भागात प्रेक्षागृह उभारण्याबाबत  यावेळी चर्चा झाली.

**<u>नळजोडणी</u>**

पिंपरी चिंचवड शहरातील नळजोडणीवर अनधिकृतपणे थेट विद्युत मोटर अथवा पंप जोडणाऱ्या ६० जणांवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागानं  कारवाई केली आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणी वापरात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. त्यामुळे मनपाच्या नळजोडीवर थेट विद्युत मोटर, पंप जोडल्यास उंच भागात पाणी कमी दाबाने पोहोचत असल्याने नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

**ब्रह्मनाद**

पुण्यात कालपासून 24 व्या ब्रह्मनाद संगीत महोत्सवाला सुरुवात झाली. ब्रह्मनाद कला मंडळ आणि धारेश्वर विद्या आणि क्रीडा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आलं आहे. गंधार देशपांडे यांच्या गायनाने महोत्सावाची सुरुवात झाली. दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध संवादिनी वादक पंडित सुधीर नायक यांचे एकल संवादिनी वादन झाले. पहिल्या दिवसाची सांगता किराणा घराण्याच्या ज्येष्ठ आणि सुप्रसिद्ध गायिका विदुषी पद्माताई देशपांडे यांच्या गायन मैफलीने झाली. आज या महोत्सवाचा समारोप होणार आहे.

**हास्य**

बदलत्या जीवनशैलीत तरूणांमध्ये विविध व्याधींवर नियंत्रण मिळवण्यासाठी हास्य व्यायाम हा रामबाण उपाय असल्याचं मत पुण्यातील हास्य क्लबचे प्रणेते आणि नवचैतन्य हास्ययोग परिवाराचे संस्थापक-अध्यक्ष विठ्ठल काटे यांनी व्यक्त केलं. हास्य चळवळीतील त्यांच्या तीन दशकांच्या वाटचालीनिमित्त विदिशा विचार मंचतर्फे आज काटे यांचा सन्मान कोहिनूर ग्रुपचे अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते  करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

**अऔप्र**

पुणे मार्केट यार्डात फळ व्यापारी आणि विक्रेत्यांची तपासणी मोहीम सुरू असून  आंबा पिकविण्यासाठी कॅल्शियम कार्बाईडचा वापर झाल्यास कारवाई करण्याचे आदेश पुण्यातील अन्न आणि औषध प्रशासनानं दिले आहेत. आंबा पिकविण्यासाठी इथिलीन गॅसचा वापर करण्यास परवानगी असली तरी त्यासाठी घालून दिलेल्या नियमांचे पालन फळ व्यापारी आणि विक्रेत्यांनी करणं आवश्यक आहे, फळांवर इथिलीनची फवारणी करण्यास मनाई आहे असं अन्न आणि औषध प्रशासनाने म्हटलं आहे.

**<u>बाजार</u>**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. उन्हाचा कडाका वाढल्याने घेवडा, सिमला, मिरची फ्लॉवर, गाजर आणि काकडी यांचे भाव वधारले आहेत. पालेभाज्यांची तोड कमी झाल्याने आवकही घटली आहे. लग्नसराईचा हंगाम सुरू झाल्याने शोभिवंत फुलांना मागणी वाढली असून दरही वाढले आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश मुख्यतः निरभ्र होतं.  कमाल तापमान 39 तर किमान तापमान 20 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**